


॥ श्री ॥

# श्री सद्गुरु  बाळूमामा विजय ग्रंथ

निवेदन (काही भाग)
डॉ. श्री. द. देशमुख

संत बाळूमामांचे पहिले चरित्रलेखक मा. शंकरराव रा. किल्लेदार (यमगे) हे माझे परममित्र आहेत. जवळपास दोन वर्षे त्यांनी चरित्राचे धागे मोठ्या परिश्रमाने जुळविले व त्यातून 'भावभक्तीचा भंडारा' हा चरित्र ग्रंथ आकाराला आला. प्रत्येक प्रकरणाची जुळवाजुळव करताना आम्ही वरचेवर चर्चा केली. ग्रंथ प्रसिद्ध झाल्यावर काही महिन्यातच मा. शंकररावांच्या असे लक्षात आले की, मराठी मन संतांचे गद्य चरित्र मनापासून स्वीकारीत नाही. भावभक्तिपूर्वक पारायण करण्यासाठी ओवीबद्ध चरित्र फार फार गरजेचे आहे. वास्तविक आपला स्वतःचा ग्रंथ मागे पडण्याची शक्यता असूनही त्यांनी ही गरज पूर्ण करण्यासाठी मला मोठ्या प्रेमाने व आग्रहाने तसे सुचविले. पूजनीय संत बाळूमामांच्या आशीर्वादाने त्यांचा हा संकल्प माझ्याकडून पूर्ण झाला याची मला मोठीच धन्यता वाटते. ----

मामांचे जीवन हे वेगाने वाहणाऱ्या स्वच्छ मधुर पाण्याच्या निर्झरा प्रमाणे होते. कोणत्याही प्रकारे त्यात न्हालेला जीव अतृप्त राहू नये. पण त्यासाठी मामांना समजावून घेणे आवश्यक आहे. चमत्कार व धाक यामुळे केलेली उपासना कधीच दर्जेदार होत नाही. त्यांचे बहुतेक भक्त असेच होते व आहेत. या चरित्रात चमत्कार जरुर आहेत व ते अनुभवलेले आजही हयात आहेत. पण हा त्यांच्या संतत्वाचा अगदी गौण भाग ठरतो. चमत्कार जगाला दाखविण्यासाठी केलेले नसतात. ते त्या त्या प्रसंगी त्या त्या व्यक्तीपुरते होवून जातात. त्यांना प्रदर्शनाचे मूल्य नसते व नसावे. त्यामुळे अंधश्रद्धेत भर मुळीच पडू नये. न्याय, निती, धर्म व अध्यात्म या चार आधारस्तंभांवर श्रीबाळूमामांचे चरित्र उभारलेले आहे. चमत्कारांच्या रंगाने ते उठून दिसते एवढेच.

भारताच्या आजच्या समाजजीवनाला घाणेरडे राजकारण, आततायी धर्मकारण, पोटार्थी शिक्षणकारण व विनाशकारी समाजकारणाची भयानक कीड लागली आहे. स्वार्थ, बेफिकिरी, कामचुकार वृत्ती, दबाव व गुंडगिरीच्या जळवा लागल्या आहेत. अशा या अत्यंत अस्वस्थ व भयकारी परिस्थितीत या निर्मळ चरित्राची हिरवळ चित्तवृत्ती शांत करील व सुखाचा आणि समाधानाचा मार्ग दाखवील यात मुळीच शंका नाही वाटत नाही.

## अध्याय - १

श्री जगदंबेचे करवीर। तैसे बाळूमामाचे आदमापूर। दोन्ही ठिकाणी पूर। भाविकांचा॥१॥ जगदंबेसी मंगळवार। आणि तैसा शुक्रवार। बाळूमामासी रविवार। अमावस्या॥२॥ आदमापूरी येती धनगर। तैसे मराठी वीर। सर्व जातीसी आधार बाळुमामांचा॥३॥ पवित्र असे गाभारा। उंच असे चौथरा। तेथे पूर्णाकृती गुरुवरा। बैसविले असे॥४॥ पाठी श्री विठ्ठलमूर्ती। पाहे

बाळूमामांची आरती। भक्तापाठी लपे कीर्ती। संतांची वाढवी॥५॥ तेथ भंडारा हेची गंध। भंडाराची तोडे बंध। तोची फोडे बांध। अज्ञानाचे॥६॥ हा देव नसे व्यापारी। धंदा नाही पुजारी। येथे येती ते नरनारी। भावबळेची॥७॥ परी घातलिया सांकडे। भक्त जे का भाबडे। ओलांडीती कडे। संकटाचे॥८॥ जेथे भाव नाही उणा। संकटी धावे देवराणा। करे लपवा छपवी तो उताणा। निश्चय पडे॥९॥ येथे भावाचा वाजे ढोल। भाविक नाचती करून गोल। आत मायेचा डौल। उतरोनी जाई॥१०॥ जे जे येती भक्तगण। सोसती उन्हाची रणरण। चालती दूर पादत्राण-। असो नसो॥११॥ भक्त थंडीने कुडकुडे। पर्जन्य तयासी झोडे। तरी तो ना सोडे। भाव आपुला॥१२॥ जवळी असे शिदोरी। आणि ती नसे तरी। चूल मांडोनी शेजारी। प्रसाद करिती॥१३॥ मंडप मोठा देवळा। टेके कळस आभाळा। वरी नाना मूर्तींचा मेळा। कोरिला असे॥१४॥ जे मंडप भाविकी भरे। हर एकी मामा अवतरे। भाव तेची रूप खरे। संताचे असे॥१५॥ आणि जे भावविण। वायाची घेती शीण। इंद्रियां जयांचे वळण। प्रपंचाचे॥१६॥ प्रपंच जयाचे बोलणी। प्रपंच जयाचे चालणी। तया बाळूमामांची देखणी। मूर्ती ना दिसे॥१७॥ तयांसी दिसे दगड। बंद भेटीचे कवाड। जाता येता काबाड। कष्टची तयां॥१८॥ तयासी नारळ मिळे। परी तो करवंटी गिळे। अमृतापरी पाणी गळे। भूमीवरी॥१९॥ कपाळ तयाचे पिवळे। परी मन आंतरी वळवळे। कामक्रोधादी न ढळे। अंतरीचा॥२०॥ कपट निंदा चहाडी। नजर परस्त्रीवरी निधडी। तया बाळूमामांची चावडी। चुकेचिना॥२१॥ म्हणून बाळूमामांचे चरित्र। नित्य पढावे पवित्र। तया जीवनाचे सूत्र। ध्यानी धरावे॥२२॥ जीवन जे गंगेवाणी। सत्याने भरली वाणी। कण्या अमृताची खाणी। जयाचे जवळी॥२३॥ बकरी जैसा प्राणी। तोही ठेविला चरणी। मग माणसा ऐसा गुणी। का न ठेवी?॥२४॥ हा पहिला अध्याय पूर्ण। जेणे अविद्या होई चूर्ण। अज्ञानाचा गहिरा वर्ण। फिका होई॥२५॥

अध्याय - ८

शास्त्र कळे, नाम असे। गुण संपदाही अंगी वसे। तरी संप्रदायाविण नसे। कवणा गती॥१॥ म्हणून बाळूमामा वारकरी। नित्य जाती पंढरपुरी। आगगाडीची यात्रा तरी। भावपूर्ण॥२॥ जयरामादी सोबती अठरा। जाती विठोबाच्या पंढरपुरा। बडव्या हाती सर्व उपचारा। पूजा केली॥३॥ ते मंदिराबाहेर विसावता। कोणी रामभाऊ उत्पाता। कैसी बुद्धी धरोनी नम्रता। जवळी आला॥४॥ सवेची मामांचिये चरण। धरिले घेवोनी लोळण। ना राखिता देहाची जाण। तृप्त झाला॥५॥ कोण हा उत्पात ब्राम्हण। न जाणिती तया कवण। कैसा आलासे शरण। कोणी ना जाणे॥६॥ मग भोजन झालेवरी। बोलाविता उत्पाता घरी। पुसती - तू कासया तरी। चरण सेविले? ॥७॥ उत्पात म्हणे - आपण कोण?। कैसे सेविले चरण। आपुली नसे ओळखण। पूर्वी कधी॥८॥ मी विठोबाचा पुजारी। मनुष्याचे चरण ना धरी। संतांचे पडे चरणांवरी। कदाकाळी॥९॥ येथ असे घोटाळा। ना तरी विठोबाची कळा। आपुल्या स्मरणाते उजाळा। तुम्ही द्यावा।१०॥ ऐसे उत्पाताचे बोलणे। सारे ऐकती निमूटपणे। दक्षिणा देवोनी बोळवणे। तया केले॥११॥ एकमेका पाहती टकमका। मामातें पाहती एकटका। जे झाले तयाचा आवाका। अपूर्वतेचा॥१२॥ कीं विठ्ठल झाला उत्पात। दाविली भक्ती प्रेमाची मात। मामांचे जाणिती गुपित। श्रेष्ठत्वाचे॥१३॥ उत्पात जो का खरा। तोही करी विचारा। मनी म्हणे - हा संतची दारा। चालोनी आला॥१४॥ दुसरे दिनी गोपाळपुरा। जाती जनाईच्या मंदिरा। वाकळ, जाते संसारा। कौतुके पाहती॥१६॥ ते मंदिरा बाहेरी येता। एक वृद्धा आली धावता। मामांचे चरणी माथा। ठेविला तिने॥१७॥ संता मोठेपण नावडे। ते म्हणती ये म्हातारडे। तू माझीया चरणी का पडे। लटके रागे॥१८॥ ती म्हातारी ना बावरे। किंचितही ना घाबरे। हंसोनी मामा उत्तरे। नम्रत्वाने॥१९॥ अरे श्रीकृष्ण जेव्हा होता। तै गोपाळासवे घेता। तेथे मी पाहिले खेळता। तोची तू की॥२०॥ मग बाळूमामा वरमले। गुपित आमचे फुटले। सोबती थक्क झाले। मती न चाले॥२१॥ म्हातारी तरी आताची। मूर्त येथे मामांची। आठवण सांगे श्रीकृष्णाची। द्वापारयुगाची॥२२॥ दिधली म्हातारीसी दक्षिणा।

योजना ठेविली आमरणा। सोबती म्हणती देवराणा। आमुचे मामा॥२३॥ आता येथून पुढती। चमत्कार मामा दाविती। श्रद्धा पावती मूढमती। नाठाळ तैसे॥२४॥ आठवा अध्याय पूर्ण। जेणे अविद्या होई चूर्ण। अज्ञानाचा गहिरा वर्ण। फिका होई॥२५॥

अध्याय - २४

कैसे नेणे माझे सुदैव। कोठे पूजिला कोण देव। मुरगूडी लाभला। ठाव। मानवी देही॥१॥ मनुष्यत्वे जन्मा यावे। मुमुक्षत्वही लाभावे। संती आश्रया घ्यावे। भाग्य तेची॥२॥ रुग्णालयी करवीर क्षेत्री। सेवा घडली दरिद्री आर्ती। तियेची होता पूर्ती। जोडिले पुण्य॥३॥ तै जे जे का वरिष्ठ। होता ते पूर्ण संतुष्ट। हिता मम कराया पुष्ट। जाहले राजी॥४॥ मग वेदगंगेचे तटी। इक्षुदंड दाटी वाटी। पात्र आले ओठी। कल्याणाचे॥५॥ एके दिनी प्रातःकाळी। कोणी आली मंडळी। म्हणती आदमापुराचे तळी। मामा असती॥६॥ दंत दुखे त्यांचा भारी। तो काढणे आहे तरी। तुम्ही यावे आदमापुरी। हेची वेळा॥७॥ तै तारुण्य अंगी मस्त। कैसा देव कोठे संत। परी मंडळी सांगती मात। बाळूमामांची॥८॥ मामा न साधे रुग्ण। सहस्र सेविती त्यांचे चरण। आपुल्या भाग्याची खूण। होती सेवा॥९॥ वैद्याचे न चाले जेथे। मामांचा उपायो तेथे। वैद्यही येती उपचाराते। मामांजवळी॥१०॥ धरोनी आदमापुरा आदरू। मामासमोरी सादरू। लवोनी केला नमस्कारू। पाहिला दंत॥११॥ ते माते पाहती कौतुके। माझाही माथा झुके। वेदनी डोळाही न झाके। काढिता दंत॥१२॥ ते संतोषाची मूर्ती। तयांचे रुपे शांती। प्रसन्नमुख शोभे कांती। निर्भयत्वे॥१३॥ मी वैद्य मामा रुग्ण। मी आहे कोठे ठिकाण। ऐसी नुरली काही जाण। कां न कळे॥१४॥ मग पाच रुपये देता। मी नको ऐसे म्हणता। हा प्रसाद असे तत्त्वता। समजाविती॥१५॥ त्या प्रसादाचेनी बळे। जीवन पुढती उजळे। प्रेया सवे श्रेय फळे। जीवनामाजी॥१६। माणसाते मामा तारिती। हे नवल कोणते रीती। बकरी ती ही वाचविती। बळींची जी॥१७॥ श्री क्षेत्र अप्पाचीवाडी। तेथे असे एक शिंगाडी। घरी वैभव गाडी घोडी। परी पुत्र नाही॥१८॥ उपायो केले नाना। वैद्य पाहिले काना कोना। गंडे दोरे नाना। सीमा नाही॥१९॥ मग कोणी तयासी सांगे। बकरी बळी द्यावे अंगे। तियेसी गर्भ असावा संगे। तरीच फळे॥२०॥ मग गर्भिणी पाही बकरी। पुजाया बांधिली दारी। पूजा संपता उदरी। घालण्या सुरी॥२१॥ ती बकरी बें बें करी। तंव मामा पातले त्या घरी। दया उपजली अंतरी। मुक्या प्राण्याची॥२२॥ मग सत्य जेव्हा जाणती। शिंगाड्या ते शिव्या देती। म्हणती रिती ही कोणती। पुत्र प्राप्तीची॥२३॥ शिंगाडे सांगे सारे। मी स्वार्थाचिया अविचारे। मारु पाहे बिचारे। मुके प्राणी॥२४॥ मग मामांचिया कृपाबळे। पुत्रगण घरी खेळे। शिंगाडे प्राणी पाळे। देव जैसे॥२५॥ चोवीस अध्याय पूर्ण। जेणे अविद्या होई चूर्ण। अज्ञानाचा गहिरा वर्ण। फिका होई॥२६॥

***